Printed from
महाराष्ट्र टाइम्स The Maharashtra Times -Breaking news, views. reviews, cricket from across India

# व्हिजनरी रामदास

29 Apr 2011, 0140 hrs IST

SMS NEWS to 58888 for latest updates

' व्यवस्थापन म्हणजे मानवी जीवनावर, लक्ष्याच्या किंवा ध्येयाच्या साहाय्याने मिळवलेले पद्धतशीर नियंत्रण' हे एकद ा समजून घेतले की या विषयीचे ज्ञान फक्त आधुनिक कारखाने, व्यवस्थापन महाविद्यालये, सॉफ्टवेअर फर्मसमध्येच असते या अंधविश्वासाला तडा जातो. १७व्या शतकातील समर्थ रामदास स्वामींच्या दासबोधादी ग्रंथांकडे व्यवस्थापनाच्या चष्म्यातून पाहिल्यावर त्यातला विचार आधुनिक व्यवस्थापनाशी मेळ घालणारा आहे हे लक्षात येते. उदाहरणार्थ, महंताने कसा कारभार करावा हे सांगताना रामदास लिहितात, येके ठाई बैसोन राहिला। तरी मग व्यापचि बुडाला। सावधपणे ज्याला त्याला। भेट द्यावी।

महंताने मठात बसून न राहता सर्व ठिकाणी भ्रमण करून माणसांच्या समस्या जाणून घ्याव्यात व कार्यावर देखरेख करावी; अन्यथा व्यवसाय बुडायला वेळ लागत नाही असे समर्थ रामदास सांगतात. आधुनिक मॅनेजमेंट गुरू टॉम पीटर्स याच्या मते मॅनेजरने आपल्या कार्यालयाच्या खोलीत बसून फक्त निर्णय घ्यायचे सोडून देऊन पूर्ण कार्यालयात किंवा कारखान्यात फिरून कामगारांशी वारंवार बोलत राहावे, त्यांच्याशी संवाद साधावा.

आजच्या आधुनिक व्यवस्थापनशास्त्रात सोशल इंजिनीअरिंग या संकल्पनेला विशेष महत्त्व मिळाले आहे. समाजाला पुन्हा प्रगतीकडे नेण्यासाठी सामाजिक पुनर्निर्माण अर्थात सोशल इंजिनीअरिंग आवश्यक असते. १७व्या शतकातील निदिस्त, असंघटित समाजाला जागृत करून, कार्यरत करणाऱ्या रामदासांनी सोशल इंजिनीअरिंगच केले आहे. समर्थांनी आपल्या सर्व लेखनातून प्रयत्नवादाचा पुरस्कार केला. व्यवहारात किंवा ऐहिक गोष्टींप्रमाणेच प्रयत्न पारमार्थिक बाबतीतही श्रेष्ठ असल्याचे आग्रहपूर्वक सांगितले. 'बारा ओव्या शत बारावे' या आपल्या रचनेत समर्थ म्हणतात,प्रेत्न आहे थोर पाहावा विचार। येणे पैलपार पाविजेतो।। पाविजेतो पार प्रारब्धेकरूनी। येत्न केल्या जनी होत नाही।। होत नाही प्रेत्ने ऐसे काय आहे। विचारून पाहे आलया रे।।

समर्थांच्या काळात अस्मानी आणि सुलतानी संकटांनी बेजार झालेल्या समाजात प्रारब्धवाद बोकाळला होता. तेव्हा 'यत्न तो देव जाणावा, अंतरी धरीता बरे' अशी शिकवण समर्थांनी दिली. आजच्या व्यवस्थापन शास्त्रातही हाच विचार प्रकर्षाने मांडला जातो. आज कारखान्यातील कामगारापासून ते क्रीडांगणावरील खेळाडू-पर्यंत प्रत्येकाला हेच पटवून दिले जाते की, निराश न होता शेवटपर्यंत प्रयत्न करा. यश नक्की मिळेल. रामदासांनी त्या काळात हेच कार्य आपल्या लेखनातून, प्रवचनांतून केले.

आधुनिक व्यवस्थापनात होलसम अॅप्रोच किंवा इंटिग्रेटेड अॅप्रोच अशी एक संकल्पना आहे. या सिद्धांतानुसार सामाजिक जीवनाच्या सर्व भागांचा जसे राजकारण, समाजकारण, अर्थकारण, आरोग्य, कला, अध्यात्म इ.चा कुठे ना कुठे एकमेकांशी संबंध येत असतोच. कुशल व्यवस्थापकाला या सगळ्यांचा एकत्रित, समग्रपणे विचार करता येणे आवश्यक असते. समर्थ रामदासांच्या साहित्यातील विषयांच्या विविधतेचा विस्तार पाहिल्यावर असा होलसम अॅप्रोच अर्थात जीवनाकडे पाहण्याचा समग्र दृष्टिकोन त्यांनी राखला होता याची खात्री पटते.

समर्थांनी व्यक्तींच्या विकासावर आणि त्या आधारे समाजाच्या विकासावर भर दिला. रामदासांचा विश्वास होता तो आंतर्बाह्य बदलासाठी प्रत्येक व्यक्ती घेऊ शकणाऱ्या मेहनतीवर. व्यवस्थापनतज्ञ स्टीफन कोवे यालाच व्यक्तीविकासाचा इनसाइड- आऊट अॅप्रोच (आंतरबाह्य बदल) असे नाव देतात. कोवे सांगतात, 'आंतरबाह्य बदलाच्या धोरणाप्रमाणे इतरांवर विजय मिळवण्याआधी स्वत:वर विजय मिळवला पाहिजे. इतरांना वचने देऊन ती पूर्ण करण्याआधी स्वत:ला दिलेले वचन पाळले पाहिजे. स्वत:त सुधारणा घडवून आणण्याआधी इतरांबरोबरचे संबंध सुधारणे व्यर्थ आहे.' याच मताचे प्रतिपादन समर्थांनीही केले आहे. ते सांगतात, विवेके क्रिया आपुली पालटावी। अती आदरे शुद्ध क्रिया धरावी। जनी बोलण्यासारीखे चाल बापा। समर्थांची व्यवस्थापनदृष्टी ही अशी आधुनिक काळाला समांतर होती. त्यांचे व्हिजन दीर्घ पल्ल्याचे आणि सर्वसमावेशक होते.

- डॉ. सुधीर निरगुडकर
.............

डॉ. सुधीर निरगुडकर हे बांधकाम उद्योगात आपल्या व्यवस्थापकीय कौशल्याने यश मिळविणारे व्यवस्थापन तज्ज्ञ आणि 'एक असतो बिल्डर,' 'समर्थ रामदासांची व्यवस्थापन नीती' व 'राजमार्ग यशाचा' या पुस्तकाचे लेखक आहेत.

या बातमीला ट्विट करा

**या बातमीवर तुमचं मत मांडण्यासाठी** इथे क्लिक करा.

इतर बातम्यांचे व्हिडिओ पाहण्यासाठी क्लिक करा

Powered by Indiatimes

About Us | Advertise with Us | Terms of Use | Privacy Policy | Feedback | Sitemap

Copyright © 2011 Bennett Coleman & Co. Ltd. All rights reserved. For reprint rights: Times Syndication Service

This site is best viewed with Internet Explorer 6.0 or higher Firefox 2.0 or higher at a minimum screen resolution of 1024x768